# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पभूचा बाप्तिस्मा

## सकाळची प्रार्थना

*महत्वाची सूचना ः  ख्रिस्तसभेची प्रार्थना किंवा ब्रिविअरी प्रार्थना हा प्रकार खूप प्राचीन आहे. मठवासी धर्मगुरूंकडून आलेली ही प्रार्थना चर्च आपली अधिकृत प्रार्थना म्हणून मानते. सदर प्रार्थनेचं एक महत्वाचं वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण प्रार्थना बायबलवर आधारीत आहे. धर्मगुरू धर्मभगिनी तसेच अनेक प्रांपचिक ही प्रार्थना नित्यनेमाने करीत असतात. आपल्या संपूर्ण कुटुंबाला एकत्रित करून आपण ही प्रार्थना करावी. चिंतन व गरजेनुसार विनंत्या ह्या प्रार्थनेमध्ये अंतर्भूत करता येतील. ख्रिस्त सभेची ही महत्वाची प्रार्थना करण्यापूर्वी घरात प्रार्थनामय वातावरण तयार करा. टिव्ही मोबाईल बंद करा, घरातल्या राजपिठासमोर मेणबत्या लावा, प्रार्थनेला योग्य असे कपडे करा व आपल्या कुटुंबासाठी हा एक भक्तीमय सोहळा बनवा. ख्रिस्तसभेची ही महत्वाची प्रार्थना आपणांस सतत प्रेरणा देत राहो.*

चरण: प्रभो, आमचे ओठ उघड.

प्रतिसाद: आणि आम्ही तुझ्या नामाचे स्तवन करू.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** ख्रिस्त पित्याचा प्रिय पुत्र आहे. त्याच्याविषयी पिता संतुष्ट आहे. चला, आपण त्याचा जयजयकार करू.

स्तोत्र २४

पृथ्वी व तिच्यावरील सर्व काही परमेश्वराचे आहे;
जग व त्यात राहणारे परमेश्वराचे आहेत.
कारण त्यानेच सागरावर तिचा पाया घातला,
त्यानेच जलप्रवाहांवर तिला स्थिर केले. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

परमेश्वराच्या डोंगरावर कोण चढेल?
त्याच्या पवित्र स्थानात कोण उभा राहील?
ज्याचे हात स्वच्छ आहेत आणि ज्याचे मन शुद्ध आहे,
जो आपले चित्त असत्याकडे लावीत नाही,
व कपटाने शपथ वाहत नाही तो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

त्याला परमेश्वरापासून आशीर्वाद मिळेल,
आपल्या उद्धारक देवाच्या हातून तो नीतिमान ठरेल.
त्याला शरण जाणारे हेच लोक होत;
हे याकोबाच्या देवा,
तुझ्या  दर्शनासाठी उत्सुक असलेले ते हेच. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा;
पुरातन द्वारांनो, उंच व्हा;
म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

हा प्रतापशाली राजा कोण?
बलवान व पराक्रमी परमेश्वर,
युद्धांत पराक्रमी परमेश्वर तोच, आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा;
पुरातन द्वारांनो, उंच व्हा;
म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

हा प्रतापशाली राजा कोण?
सेनाधीश परमेश्वर,
हाच प्रतापशाली राजा. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** ख्रिस्त पित्याचा प्रिय पुत्र आहे. त्याच्याविषयी पिता संतुष्ट आहे. चला, आपण त्याचा जयजयकार करू.

गीत ः नाताळ गीत

**प्रतिगीत १:** सेनापती राजाला, सेवक प्रभूला, योहान बाप्तिस्ता तारणाऱ्याला बाप्तिस्मा देतो. यार्देनेचे पाणी आश्चर्यचकित झाले आहे. कबुतराचे चिन्ह दृष्टीस पडते, पित्याची वाणी घोषणा करते : हा माझा पुत्र आहे.

**स्तोत्र ६३: २ - ९**

हे देवा, तू माझा देव आहेस;
मी आस्थेने तुझा शोध करीन;

शुष्क, रूक्ष व निर्जल प्रदेशात
माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे,
माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे.
अशाप्रकारे तुझे बळ व वैभव पाहण्यास पवित्रस्थानी
मी तुझ्याकडे दृष्टी लाविली आहे.

तुझे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे;
माझे ओठ तुझे स्तवन करतील.
मी जिवंत आहे तोपर्यंत तुझा धन्यवाद असाच करीन;
तुझ्या नावाने मी आपले हात उभारीन.
मज्जेने व मेदाने व्हावा तसा माझा जीव तृप्त होईल,
आणि माझे मुख हर्षभरित होऊन तुझे स्तवन करील.

मी रात्री आपल्या अंथरूणावर पडून तुझे स्मरण करतो,
व प्रहरोप्रहरी तुझे ध्यान करीत असतो.
कारण तू माझे साहाय्य होत आला आहेस,
म्हणून तुझ्या पंखांच्या सावलीत मी आनंद करीन.
माझ्या जिवाने तुझी कास धरली आहे;
तुझा उजवा हात मला सांभाळून धरतो;

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत १:** सेनापती राजाला, सेवक प्रभूला, योहान बाप्तिस्ता तारणाऱ्याला बाप्तिस्मा देतो. यार्देनेचे पाणी आश्चर्यचकित झाले आहे. कबुतराचे चिन्ह दृष्टीस पडते, पित्याची वाणी घोषणा करते : हा माझा पुत्र आहे.

********

**प्रतिगीत २:** जेव्हा ख्रिस्त पृथ्वीवर अवतरला तेव्हा पाण्याचे झरे पवित्र झाले. तारणाऱ्याच्या विहिरीतून पाणी काढा. ख्रिस्त आपला परमेश्वर ह्याने संपूर्ण सृष्टी पवित्र केली आहे.

**काव्य - तीन युवकांचे गीत: ३५-६८**

प्रभूच्या साऱ्या कृत्यांनो, त्याचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
तारामंडळांनो प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभूच्या दूतांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघातील जलांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
साऱ्या सत्तांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

हे सूर्य आणि चंद्र, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
आकाशातील ताऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
जलधारांनो आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा.
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

साऱ्या वायुंनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
अग्नी आणि उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हिवाळयातील थंडी आणि उन्हाळयातील उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

हिम आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
बर्फ आणि थंडी, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
ओसकणांनो आणि हिमांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

रात्रींनो आणि दिवसांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
उजेड आणि अंधार, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघांनो आणि विजांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

पृथ्वीने प्रभूचा धन्यवाद गावा, त्याची स्तवने गावी
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करावी.

पर्वतांनो आणि टेकडयांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पृथ्वीवर वाढणाऱ्या सर्व वनस्पतीनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
अहो झऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

सागरांनो आणि नद्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
देवमाशांनो आणि जलचरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हवेत संचारणाऱ्या सर्व पक्षांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पशूंनो आणि गुरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो मानवपुत्रांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो इस्त्राएली लोकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या पुरोहितांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या सेवकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

नीतिमानांच्या आत्म्यांनो आणि जीवांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पवित्र व विनयशील जनांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हन्नानिया, अझारिया आणि मिखाएल प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभू चांगला आहे म्हणून त्याचे आभार माना
कारण त्याची दया सनातन आहे.
प्रभू देवाधिदेव यांची उपासना करणाऱ्यांनो,
त्याचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि त्याचे आभार माना कारण त्याची दया सनातन आहे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याची स्तुती करू या.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.
हे प्रभू, स्वर्गात तू धन्यवादित होवो.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.

**प्रतिगीत २:** जेव्हा ख्रिस्त पृथ्वीवर अवतरला तेव्हा पाण्याचे झरे पवित्र झाले. तारणाऱ्याच्या विहिरीतून पाणी काढा. ख्रिस्त आपला परमेश्वर ह्याने संपूर्ण सृष्टी पवित्र केली आहे.

*(ह्या काव्यानंतर पिता, पुत्र... ही त्रैक्यस्तुती म्हणत नाही.)*

*******

**प्रतिगीत ३:** तू पवित्र आत्म्याने आणि अग्नीने मानवजातीची पापे नष्ट केली. आमचा परमेश्वर आणि मुक्तिदाता म्हणून आम्ही तुला भजतो आणि तुझी स्तुती करतो.

**स्तोत्र: १४९**

परमेशाचे स्तवन करा,
नवे गीत गाऊन परमेश्वराचे गुणगान करा.
भक्तांच्या मंडळीत त्याचे स्तोत्र गा.
इस्राएल आपल्या निर्माणकर्त्याच्या ठायी आनंद करो;
सियोनेची मुले आपल्या राजाच्या ठायी उल्लास पावोत.
ती नृत्य करीत त्याच्या नावाचे स्तवन करोत.
डफ व वीणा ह्यावर त्याला स्तोत्रे गावोत.

कारण परमेश्वर आपल्या लोकांवर संतुष्ट आहे;
तो दीनांना तारणाने सुशोभित करितो.
भक्त गौरवामुळे उल्लासोत;
ते आपल्या अंथरूणांवरून हर्षघोष करोत.
परमेश्वराची परमश्रेष्ठ स्तुती त्यांच्या कंठी असो;
दुधारी तरवार त्यांच्या हाती असो;

तिच्या योगे राष्ट्रांचा सूड त्यांनी उगवावा
आणि लोकांना शासन करावे.
त्यांच्या राजांना साखळदंडांनी बांधावे
आणि त्यांच्या सरदारांना लोखंडी बेडया घालाव्या.
लिहून ठेविलेला निवाडा त्यांच्यावर बजवावा,
हे त्याच्या सर्व भक्तांना भूषण होईल.
परमेशाचे स्तवन करा.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** तू पवित्र आत्म्याने आणि अग्नीने मानवजातीची पापे नष्ट केली. आमचा परमेश्वर आणि मुक्तिदाता म्हणून आम्ही तुला भजतो आणि तुझी स्तुती करतो.

## शास्त्रवाचन

यशाया ६१:१ - २अ

प्रभू परमेश्वराचा आत्मा मजवर आला आहे; कारण दीनांस शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे; भग्न हृदयी जनांस पट्टी बांधावी, धरून नेलेल्यास मुक्तता व बंदिवानांस बंधमोचन विदित करावे; परमेश्वराच्या प्रसादाचे वर्ष व आमच्या देवाचा सूड घेण्याचा दिवस विदित करावा; सर्व शोकग्रस्तांचे सांत्वन करावे.

## लघु प्रतिसाद

प्रतिसाद: तू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहेस. आम्हावर दया कर.
प्रतिसाद: तू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहेस. आम्हावर दया कर.
चरण: तुला आज प्रकट करण्यात आले.
प्रतिसाद: तू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहेस. आम्हावर दया कर.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: तू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहेस. आम्हावर दया कर.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** ख्रिस्ताला बाप्तिस्मा देण्यात आला आणि संपूर्ण जग पवित्र झाले. तो आपल्या पापांचे ऋण फेडतो. आपण सर्व जण पाण्याने आणि पवित्र आत्म्याने शुद्ध होऊ.

जखऱ्याचे स्तोत्र

इस्त्राएलचा देव प्रभू धन्यवादित असो,
कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची 'खंडणी भरून सुटका' केली आहे;

आणि आपल्यासाठी त्याने आपला दास 'दावीद'
ह्याच्या घराण्यात 'बलवान् उद्धारक प्रस्थापित केला आहे;
हे त्याने युगाच्या प्रारंभापासून
आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाद्वारे सांगितले होते;'

म्हणजे आपल्या 'शत्रूंच्या' व आपला 'द्वेष करणाऱ्या'
सर्वांच्या 'हातून' सुटका करावी;
अशासाठी की, 'आपल्या पूर्वजांवर' त्याने 'दया' करावी.
आणि त्यानें 'आपला' पवित्र 'करार' म्हणजे जी शपथ
आपला पूर्वज 'अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली', ती 'स्मरावी',

ती अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून
माझ्यासमोर पवित्रतेने व नीतीने
आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

आणि हे बाळका, तुला परात्पराचा संदेष्टा म्हणतील,
कारण 'प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तू त्याच्यापुढे' चालशील;

ह्यासाठी की, त्याच्या लोकांस त्यांच्या पापांच्या क्षमेने तारणाचा अनुभव द्यावा.
आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे;
तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल.

'ह्यासाठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा',
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** ख्रिस्ताला बाप्तिस्मा देण्यात आला आणि संपूर्ण जग पवित्र झाले. तो आपल्या पापांचे ऋण फेडतो. आपण सर्व जण पाण्याने आणि पवित्र आत्म्याने शुद्ध होऊ.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

आपण आपल्या मुक्तिदात्याकडे प्रार्थना करू या. तो योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्यासाठी नम्र झाला. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

हे ख्रिस्ता, आमच्या प्रभो, आम्ही जीवन कसे जगावे ते तू आम्हाला शिकविलेस. - जो प्रकाश आमच्या नेत्रांना तेजस्वी करतो तो पाहण्यासाठी आमचे नेत्र उघड. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

आपल्या सेवकाच्या हातून बाप्तिस्मा घेण्यासाठी तू नम्र झालास - तुझ्या तारणदायी कार्यात सहभागी होण्यास आणि स्वत:चे सर्वस्व झोकून देऊन इतरांची सेवा करण्यास आम्हाला सहाय्य कर. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

तुझ्या बाप्तिस्म्याने आम्हाला पित्याची मुले बनविले. - जे तुझा शोध घेत आहेत त्यांना पुत्रत्वाचा आत्मा प्रदान कर. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

बाप्तिस्म्याद्वारे तू आम्हासाठी पश्चातापाचा दरवाजा उघडला आहेस. - आम्हाला तुझ्या नवजीवनाच्या सुवार्तेचे सक्रीय सेवक बनव. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

तुझ्या बाप्तिस्म्याने आम्हाला पवित्र त्रैक्यातील व्यक्ती प्रकट केल्या. - बाप्तिस्मा स्वीकारलेल्या सर्वांच्या राजेशाही याजकपदातील देव-पुत्रत्वाच्या आत्म्याने नूतनीकरण कर. प्रतिसाद: हे प्रभो, आम्हावर दया कर.

आमच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना

हे सर्वसमर्थ पित्या, यार्देन नदीच्या काठी येशूच्या बाप्तिस्म्याच्यावेळी पवित्र आत्मा त्याच्यावर उतरला व तो तुझा प्रिय पुत्र आहे असे तू घोषित केलेस. पाण्याच्या व पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने आम्हीदेखील तुझी मुले बनलो आहोत. तुझ्या मुलांना शोभेल असेच आचरण आम्हाकडून घडू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.